## निशाणी क्रं. ०५ वरील आदेश

१) अर्ज व निशानी १३ वरील प्रतिवादीचा जबाब वाचला. दोन्ही बाजुचा युक्तिवाद ऐकला.

२) दिवाणी प्रक्रीया संहिता आदेश ३९, नियम १ व २ प्रमाणे वादीने त्याचे हक्कात तात्पुरता मनाई हुकूम आदेश पारीत करणे करीता हा अर्ज दाखल केला आहे. प्रतिवादीने निशानी १३ वर त्याचा जबाब दाखल केला आहे.

३) अर्जाचे निकाली कामी खालील मुद्दे काढलेले आहेत व त्यांची खालील प्रमाणे कारणे मिमांसा निष्कर्षासहित देण्यात आलेली आहेत.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादीने प्रथम दर्शनी केस त्याचे हक्का मध्ये सिध्द केलेली आहे काय? | .... नकारार्थी. |
| २. | वादी असे सिध्द करतो का की अनुकुलतेचा समतोल त्याचे हक्का मध्ये आहे? | ....नकारार्थी. |

३. वादी असे सिध्द करतो का की अर्ज नामंजूर केला तर त्याचे अपरिमित नुकसान होईल ? .... नकारार्थी.

४. काय आदेश ? .... अंतिम आदेशाप्रमाणे.

## कारणमिमांसा

### मुद्या क्रं. १ ते ३ करीता

४) वादी व प्रतिवादी हे एकमेकांचे चुलत भाउ आहेत. रामकृष्ण विश्राम बोके हा त्यांचे कुटूंबाचा कर्ता पुरूष होता. दिनांक २९.१२.१९४९ रोजी रामकृष्ण ने मौजा वरखेड येथील त्याची घर मिळकत, खुली जागा व शेती ही स्वत: व त्याची चार मुले भाउराव, विठ्ठल, ज्ञानेश्वर व बाळकृष्ण यांचे मध्ये वाटुन दिली होती. वादी मोहन हा विठ्ठल चा मुलगा आहे. प्रतिवादी मुकूंद हा भाउराव चा मुलगा आहे. वाटणी नुसार वादीचे वडील विठ्ठल यास दाव्यात दाखल नकाशात नमुद अ ब इ फ ज ख झ च छ प य ल त अ या अक्षराने दर्शवीलेली मिळकत हिस्यास मिळालेली आहे. त्या मिळकतीच्या पुर्वे कडील नकाशात दर्शवीलेली मिळकत प्रतिवादीचे वडीलांना वाटणी हिस्यात मिळाली होती.

५) वादीचे वडीलांनी त्यांना मिळालेल्या हिस्से वाटणीच्या जागेच्या पश्चिमेकडे असलेला पडका इमला व खाली जागा दिनांक ०९.०३.१९६२ रोजी शेषराव बोके या

इसमा कडुन नोंदणीकृत खरेद खताने खरेदी केली आहे. त्यामुळे वादीचे वडीलांना वाटणीत मिळालेली मिळकत व शेषराव कडुन खरेदी खताने खरेदी केलेली मिळकत एकरूप झालेली आहे.

६) प्रतिवादीचे वडीलांना मिळालेल्या मिळकतीचा भुखंड नंबर ५०५ व वादीचे वडीलांचा भुखंड नंबर ५१२ असा आहे. वाटणी नुसार वादी हा सदरचे जागेचा मालक व ताबेदार आहे. दाव्या सोबत जोडलेल्या नकाशात वादीने द या अक्षराने एक दरवाजा दर्शवीला आहे. वादीचे कथनानुसार त्याचे वडीलांना मिळालेल्या मिळकतीवर व शेषराव कडुन खरेदी केलेल्या मिळकतीवर जाणे साठी त्याला द या अक्षराने दर्शविलेल्या दरवाज्याचा उपयोग करावा लागतो. सदरचे दरवाज्याशी प्रतिवादीचा कसलाही हक्क संबंध नसताना प्रतिवादी हा त्या दरवाज्याचा उपयोग करून त्यातुन स्वत:ची जनावरे ने आण करत असतो. त्यामुळे वादीला नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

७) प्रतिवादीला त्याचे जागेत ये जा करणे साठी द या दरवाज्या शिवाय इतर भागातुन जागा असतानाही तो या दरवाज्या चा उपयोग घेत आहे. द या दरवाज्या जवळ वादीला संरक्षक भिंत बांधणेस प्रतिवादीचा विरोध आहे. त्यामुळे द हा दरवाजा वापरणे पासुन प्रतिवादीला मनाई करण्यात यावी तसेच दावा नकाशात य प छ च झ ख या ठिकाणी

संरक्षण भिंत बांधणेस वादीला त्याने अडथळा निर्माण करू नये म्हणुन त्याचे विरूध्द तात्पुरता मनाई हुकूम आदेश पारीत करण्यात यावा अशी विनंती वादीने केली आहे.

८) प्रतिवादीने या अर्जास विरोध दर्शवीला आहे. प्रतिवादीने वाटणी अमान्य केली आहे. दिनांक ०९.०३.१९६२ रोजीचे खरेदी खत प्रतिवादीने नाकारले आहे. द या अक्षराने दर्शविलेला दरवाजा हा वादी व प्रतिवादींचा सामाईक वापराचा दरवाजा आहे असे त्याचे म्हणणे आहे. वादीचे हक्कात हा अर्ज मंजुर करणे साठी कसलाही सकृत दर्शनी पुरावा नसलेमुळे तसेच अर्ज नामंजुर केलेवर वादीचे कसलेही नुकसान होणार नसलेमुळे अर्ज नामंजुर करण्याची विनंती प्रतिवादीने केली आहे.

९) वादीने स्वहस्ते काढलेल्या नकाशातील तथाकथित द या अक्षराने दर्शविलेला दरवाजा हा त्याचे हक्काचा आहे तसेच य प छ च झ ख या अक्षराने दर्शविलेली जागा त्याचे मालकी व ताब्याची आहे याबाबत निशानी १६ सोबत दाखल खरेदी खताचे छायांकित प्रतीचा तसेच वाटणी पत्राचे छायांकित प्रतीचा आधार घेतला आहे.निशानी १६ सोबत दाखल कागदपत्रां वरून वाद जागेवर वादीचा ताबा असल्याचे प्रथमदर्शनी ग्राहय धरता येणार नाही. कारण कथित वाटणी पत्र हे नोंदणीकृत दस्त नसल्याचे दिसुन येत आहे.

१०) वाद जागेवर वादीचा ताबा असलेबाबत प्रथमदर्शनी माझे समोर निर्णायक असा पुरावा आलेला नाही. त्यामुळे अर्ज नामंजुर केला तर वादीचे कसल्याही प्रकारचे नुकसान होणार नाही असे माझे मत आहे. त्यामुळे अर्ज नामंजुर होण्यास पात्र आहे.त्यामुळे मी मुद्या क्र. १ ते ३ नकारार्थी उत्तरीत पारीत करत आहे.

**<u>मुद्या क्रं. ४ करीता</u>**

११) मुद्या क्रं. १ ते ३ ला दिलेल्या नकारार्थी उत्तरांवरून मी मुद्या क्रं. ४ करीता खालील आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जाचा खर्च दाव्यात समाविष्ट करण्यात यावा.

(व्ही.एन.गिरवलकर)
दिवाणी न्यायाधीश कनीष्ठ स्तर
तिवसा

तिवसा.
दिनांक: २५.१०.२०१८